# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. ८४/२०२२

विद्यापीठ परिसरातील संबंधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील मुले व मुलींसाठीचे वसतिगृह प्रवेश पूर्ण झालेले आहेत. प्रथम वर्षाच्या सर्व जागा भरल्या असून द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जागांपैकी काही जागा शिल्लक आहेत. सदर जागा ३० जून, २०२२ पर्यंत रिक्त राहतील व तद्नंतर शैक्षणिक वर्ष २०२२–२३ ला प्रवेशित प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येतील.

३० जून २०२२ पर्यंत रिक्त असणाऱ्या या जागा, सध्या प्रवेशित प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढील ३ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींवर उपलब्ध करुन देता येतील.

१) सदरील प्रवेश तात्पुरत्या स्वरुपात ३ महिन्यांसाठी (३० जून, २०२२ पर्यंत) असून त्यानंतर पूढील वर्षासाठी विदयार्थ्यांचा हक्क/दावा असणार नाही.

२) सदरील व्यवस्था ही जून २०२२ अखेर किंवा विभागाची परिक्षा संपेपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत असेल.

३) मुद्दा क्र २ मध्ये नमूद केलेल्या कालावधीसाठी रु. १०००/- अनामत रक्कम व वसतिगृह शुल्क रु. १२००/- तसेच वैद्यकीय शुल्क रु. ५०/- अशी एकत्रित रक्कम रु. २२५०/- भरावी लागेल.

४) वसतिगृह खोलीचा ताबा मुद्दा क्रं २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ३० जून २०२२ पूर्वी वसतिगृह कार्यालयास सुपूर्त करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यापुढे प्रतिमहिना रु. १०००/- वसतिगृह शुल्क आकारले जाईल, तसेच अनामत रक्कम जप्त केली जाईल.

५) वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वयंघोषणापत्र/प्रमाणपत्र विहीत नमुन्यात पालकांच्या सहीनिशी व विभागप्रमुखांच्या शिफारसीसह वसतिगृह कार्यालयास सुपूर्त करणे आवश्यक आहे.

मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे – ०७

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ :– सा.फु.पु.वि./वसतिगृह/२०२२/९३१
दिनांक :– ०९/०४/२०२२

**प्रत माहितीसाठी सादर :–**
मा. विभागप्रमुख :– आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

# स्वयंघोषणापत्र / प्रमाणपत्र

मी ..............................., .................. या पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रथम वर्षात शिकत आहे. वसतिगृह प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाली असून मला गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश मिळू शकला नाही, याची मला पूर्ण कल्पना आहे. मात्र मला वसतिगृहाची नितांत आवश्यकता आहे.

जर द्वितीय वर्षासाठी राखीव काही जागा शिल्लक असतील तर तात्पुरत्या स्वरुपात या सत्राच्या समाप्तीपर्यंत मला प्रवेश मिळावा अशी विनंती करीत आहे. प्रवेश मिळाल्यास मी ३०/०६/२०२२ पूर्वी वसतिगृह खोलीचा ताबा वसतिगृह कार्यालयाकडे सुपूर्त करीन तसेच पुढील वर्षी वसतिगृह प्रवेशाची मागणी करणार नाही.

विद्यार्थ्याचे नाव :

मोबाईल नं:

सही

पालकाचे नाव :

मोबाईल नं:

सही

मा. विभागप्रमुख